# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:02.10.2024** **वार:बुधवार**

---

1. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आज अनेकविध कार्यक्रमाचं आयोजन
2. स्वच्छ भारत अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त नऊ हजार सहाशे कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचा आज शुभारंभ.
3. देशातल्या 14 पूरग्रस्त राज्यांना पाच हजार आठशे पन्नास कोटी रुपयांचा मदत निधी केंद्राकडून जारी
4. जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्यात 65 पूर्णांक 65 शतांश टक्के मतदानाची नोंद
5. इराणचा इस्त्राईलवर क्षेपणास्त्र हल्ला आणि
6. देशाच्या विविध भागात अतिवृष्टीचा हवामान विभागाचा इशारा

**गांधी वंदना**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांची आज 155 वी जयंती आहे. या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली अर्पण केली आहे. सत्य, अहिंसा, प्रेम ही मूल्य आत्मसात करून महात्मा गांधींच्या स्वप्नातला भारत वास्तवात आणण्याचा संकल्प करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे. गांधी जयंतीनिमित्त आज देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून नवी दिल्लीतील राजघाट इथल्या बापूंच्या समाधीवर सर्वधर्मीय प्रार्थना सभा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सकाळी राजघाटावर जाऊन गांधीजींना आदरांजली अर्पण केली. देशासह जगभरातील भारतीय दुतावासांमध्येही आज गांधी जयंतिनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचीही आज जयंती आहे; त्यानिमित्त आज त्याचंही स्मरण केलं जात आहे.

**स्वच्छ भारत दिवस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत गांधी जयंतीनिमित्त स्वच्छ भारत दिवस कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. स्वच्छ भारत अभियानाला दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी स्वच्छतेशी संबंधित नऊ हजार सहाशे कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचा शुभारंभ पंतप्रधान करतील. यामध्ये अमृत प्रकल्प स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान आणि गोबरधन योजनेअंतर्गत 15 बायोगॅस प्रकल्पांचा समावेश आहे.

**केंद्रनिधी**

केंद्र सरकारनं 14 पूरग्रस्त राज्यांना पाच हजार आठशे पन्नास कोटी रुपयांहून अधिक निधी जारी केला आहे. यामध्ये महाराष्ट्राला एक हजार चारशे 92 कोटी रुपये, आंध्र प्रदेशला एक हजार कोटी रुपये, गुजरातला 600 कोटी रुपये आणि तेलंगणाला जवळपास चारशे सतरा कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. या राज्यांना यावर्षी अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलनाचा फटका बसला. आसाम, मिझोराम, केरळ, त्रिपुरा, नागालँड, गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मणिपूर या राज्यांमध्ये नुकसानाच्या पाहणीसाठी केंद्रीय पथकं पाठवण्यात आली होती. बाधित राज्यांच्या पाठीशी केंद्र सरकार खंबीरपणे उभं असून या वर्षात 21 राज्यांना 14 हजार 900 कोटींहून अधिक रुपयांचा निधी देण्यात आला आहे, असं केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**पश्चिम बंगाल**

केंद्र सरकारनं पश्चिम बंगालच्या पूरग्रस्तांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी म्हणजेच SDRF च्या केंद्रीय हिश्श्यातून आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी म्हणजेच NDRF कडून आगाऊ निधी म्हणून 468 कोटी रुपये जारी केले आहेत, अशी माहिती केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी समाज माध्यमावरील संदेशात दिली आहे.

**जम्मू काश्मीर निवडणूक**

जम्मू आणि काश्मीरच्या केंद्रशासित प्रदेशात, सात जिल्ह्यांमधल्या 40 विधानसभा मतदारसंघांसाठी तिसऱ्या टप्प्यातील निवडणुका काल शांततेत पार पडल्या. जम्मू विभागातील 24 विधानसभा मतदारसंघ आणि काश्मीर विभागातील 16 विधानसभा मतदारसंघांसाठी ही निवडणूक झाली. तिसऱ्या टप्प्यात काल जम्मू-काश्मीरमध्ये विक्रमी 65 पूर्णांक 65 टक्के मतदान झालं. यामध्ये काश्मीर विभागातील बांदीपोरा जिल्ह्यात सर्वाधिक 65 टक्के मतदान झाले, तर जम्मू विभागातील सांबा जिल्ह्यात सर्वाधिक 73 पूर्णांक 45 टक्के आणि उधमपूरमध्ये 72 पूर्णांक

91 टक्के मतदान झाले. याआधी,18 सप्टेंबरला पहिल्या टप्प्यात 61.38 टक्के मतदान झालं होतं आणि 25 सप्टेंबरला दुसऱ्या टप्प्यात 57 टक्के मतदान झालं होतं, निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती.

**निवडणूक**

हरियाणामध्ये येत्या शनिवारी एकाच टप्प्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांच्या वतीने जोरदार प्रचार सुरू आहे. काल हरियाणाल्या पलवाल इथ भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रचार सभा झाली. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्ष जातीचं राजकारण करत असल्याचा आरोप केला. तर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काल सोनीपत इथं सभा घेतली तसच बहादूरगड ते कल्लापूरचौकी या दरम्यान हरियाणा विजय संकल्प यात्रा काढली.

**युद्ध**

हिजबुल्लाह आणि हमास या अतिरेकी संघटनांच्या काही प्रमुख नेत्यांना मारल्याचा बदला म्हणून इराणनं इस्त्राईलवर काल क्षेपणास्त्र हल्ला केला. काल रात्री उशिरा पर्यन्त इराणनं इस्राइल वर 180 क्षेपणास्त्र डागली. इस्राइलच्या तेल अविव आणि जेरूसेलेम या दोन प्रमुख शहरांवर हा क्षेपणास्त्र हल्ला झाल्यानं नागरिकांनी बॉम्ब रोधक ठिकाणांचा आश्रय घेतला. या हल्ल्यामुळे काल दिवसभर इस्त्राईल मध्ये नागरिकांना सतर्क करण्यासाठी सतत भोंगे वाजत होते. दरम्यान, कालच्या हल्ल्यात आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही अस इस्राइल लष्कराचे प्रवक्ते डैनियल हगारी यांनी सांगितलं. मात्र या हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर म्हणून इस्त्राईल मध्यपूर्व भागात जोरदार हवाई हल्ला करेल असा इशारा ही त्यांनी यावेळी दिला. इराणने केलेला क्षेपणास्त्र हल्ला इस्त्राईलने अमेरिका आणि इतर राष्ट्रांच्या मदतीने परतवून लावला असल्याची प्रतिक्रिया अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते मैथ्यू मिलर यांनी दिली आहे.

**भारतीय दूतावास-इस्रायल**

इराण- इस्रायल यांच्यात सुरू झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तेल अवीवमधील भारतीय दूतावासानं इस्रायलमधील भारतीय नागरिकांना सतर्क राहण्याचा आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार सुरक्षा निर्देशांचं पालन करण्याचा सल्ला दिला आहे. तसंच सर्वांनी सावधगिरी बाळगावी, अनावश्यक प्रवास टाळावा आणि सुरक्षित ठिकाणी राहण्याचं आवाहनही भारतीय दूतावासानं केलं आहे. भारतीय दूतावास परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून असून आणि सर्व भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी इस्रायली अधिकाऱ्यांच्या सातत्यानं संपर्कात आहे.कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत, नागरिकांनी दूतावासाच्या अहोरात्र सुरू असलेल्या हेल्पलाइनवर संपर्क साधावा असं सांगितलं आहे.

**जयशंकर- ब्लिंकन**

परराष्ट्र व्यवहार मंत्री, डॉ. एस जयशंकर यांनी काल रात्री वॉशिंग्टन इथं अमेरिकेचे परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन यांच्याशी चर्चा केली. अमेरिकेत नुकत्याच झालेली क्वाड बैठक आणि द्विपक्षीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर द्विपक्षीय सहकार्य, पश्चिम आशियातील परिस्थिती, भारतीय उपखंड, हिंद प्रशांत क्षेत्र आणि युक्रेनमधील अलीकडील घडामोडींवरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

**अजित डोवाल**

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल सध्या फ्रान्सच्या दौऱ्यावर असून काल त्यांनी पॅरिस इथ फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इम्यान्युयल मॅक्रॉन यांची भेट घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावतीनं शुभेच्छा दिल्या. तसंच भारत आणि फ्रान्स यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने 2047 पर्यंतच्या पथदर्शी आराखड्यातील तरतुदी प्रत्यक्षात आणण्याबाबत भारताची वचन बद्धता व्यक्त केली. जागतिक शांतता राखण्याच्या दृष्टीने आणि अनेक आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी भारत आणि फ्रान्स करत असलेल्या प्रयत्नांबाबत यावेळी मॅक्रॉन यांनी समाधान व्यक्त केल. तसंच याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी करत असलेल्या प्रयत्नांचीही त्यांनी स्तुती केली. दरम्यान, डोवाल यांनी फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांचे धोरण सल्लागार एम्युयल बोने तसच संरक्षण मंत्री सेबॅस्टिन लेकोर्नू यांच्याशी ही काल चर्चा केली.

**नेमबाजी**

आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताच्या पार्थ राकेश माने यानं 10 मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक जिंकलं. पेरू इथल्या लिमामध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताच्या अजय मलिक आणि अभिनव शॉ या जोडीनेही 10 मीटर एअर रायफल स्पर्धेच्या पुरुषांच्या सांघिक गटात सुवर्णपदक पटकावलं. तर याच स्पर्धेच्या महिलांच्या कनिष्ठ गटात गौतमी भानोत, शांभवी क्षीरसागर आणि अनुष्का ठाकूर यांनी 10 मीटर एअर रायफलमध्ये सांघिक स्पर्धेत भारताला तिसरं सुवर्ण पदक मिळवून दिलं. या स्पर्धेत सध्या भारत पाच सुवर्णपदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

**क्रिकेट**

कानपूर क्रिकेट कसोटी सामन्यात भारतानं बांगलादेशावर सात गडी राखून विजय मिळवत दोन सामन्यांची ही मालिका 2-0 नं जिंकली आहे. दुसऱ्या कसोटीत काल अखेरच्या दिवशी भारताला सामना जिंकण्यासाठी 95 धावांची आवश्यकता होती. भारतीय संघानं सतरा षटकं आणि दोन चेंडूत तीन गडी गमावत 98 धावा केल्या. रवींद्र जडेजाने या सामन्यात तीन हजार धावा आणि तीनशे बळींचा टप्पा पार केला. सर्वात कमी

म्हणजेच 74 कसोटी सामन्यांमध्ये अशी कामगिरी करणारा जडेजा हा इंग्लंडच्या इयान बोथम याच्यानंतरचा दुसरा खेळाडू ठरला आहे. रविचंद्रन अश्विन मालिकावीर तर यशस्वी जैस्वाल सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

**हवामान**

भारतीय हवामानशास्त्र विभागानं येत्या दोन दिवसांत अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मिझोराम, मणिपूर आणि त्रिपुरामध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तर तमिळनाडू, पुद्दुचेरी, कर्नाटकचा किनारपट्टीलगतचा भाग आणि कराईकलमध्येही 5 ऑक्टोबरपर्यंत मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर येत्या 2 ते 3 दिवसांत राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि जम्मू-काश्मीर-लडाख-गिलगिट-बाल्टिस्तान मुझफ्फराबाद आणि हिमाचल प्रदेशच्या काही भागांतून नैऋत्य मान्सून माघारीसाठी हवामान अनुकूल होत असल्याचंही हवामान विभागानं सांगितलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.